Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 6, Dec. 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

समलैंगिकता : एक दृष्टिकोन

ए. व्ही. नामा

सारांश

एकाच लिंगाच्या दोन व्यक्तींमधील लैंगिक आकर्शण व समागम क्रियेस समलैंगिकता (Homosexuality) म्हणतात. जी व्यक्ती केवळ स्वतःच्या लिंगाच्या इतर व्यक्तींबद्दल लैंगिक आणि अलैंगिक प्रणयदृश्ट्या आकर्शित होते. अशा व्यक्तीस 'समलैंगिक' असे म्हटले जाते. प्रत्येक जिवाचे सुखप्राप्तीचे विशय भिन्न–भिन्न आहेत व काही साम्यही आहेत. संभोग क्रियेतून आनंद होणे, हा सुध्दा सुख प्राप्तीचा एक विशय आहे. प्रत्येक व्यक्ती ज्या ज्या विशयातून सुख मिळेल ते ते मिळविण्याचा प्रयत्न करीत असते, ही एक सहजप्रवृत्ती आहे आणि ते ते विशय निवडून त्या माध्यमातून सुखाचा अनुभव घेत असते. समलिंगी समागम क्रियेतूनसुध्दा आनंद मिळत असल्याने ते सुध्दा एक सुखप्राप्तीचे एक माध्यमच आहे. समलिंगी हा संबंध पुरूश–पुरूशामध्ये घडून येणारा संबंध असेल, ज्याला इंग्रजीमध्ये Gay असे म्हणतात किंवा हा संबंध दोन स्त्रियांमध्येसुध्दा असू शकते, ज्याला इंग्रजीमध्ये Lesbian म्हणतात.

प्रथमतः लैंगिक सुख (कामसुख), मग ते समलिंगी असो किंवा विषमलिंगी असो, हा एक तिरस्करणीय विचार असून आयुष्याचे वाटोळे करणारा विषय आहे. असा समज काही तत्त्वज्ञानात्मक आणि भक्तिप्रधान वाङ्मयावरून बहुतेकांचा झालेला दिसतो. त्यामुळे आजन्म ब्रह्मचर्याचें अवास्तव स्तोम आमच्या समाजांत काही ठिकाणी माजलेला दिसतो आणि या लैंगिक सुखापासून पूर्णपणे परावृत्त झाल्याशिवाय परमार्थ नाही, अशी चुकीची समजूतही सर्वत्र पसरलेली दिसते. अगदी भगवद्गीतेचा आधार घेउन कामविकाराचा सर्वतः तिरस्कार दर्शविला गेलेला दिसून येतो. उलट भगवद्गीता – टीकाकारांनी 'लैंगिक सुख' ही सहज प्रवृत्ती त्याज्य मानलेली नसून, 'धर्मअविरूध्द काम' ही कास धरली आहे. भगवान मनुने व त्याच– बरोबर वात्सायनाने 'लैंगिक सुख' अर्थात 'काम' ही एक सहजप्रवृत्ती तर आहेच आहे, त्याचबरोबर तो एक पुरूषार्थ ही आहे, असे म्हटलेले आहे. त्याविषयी बऱ्याच टीकाकारांनी आपापल्या परिने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थातच ही जी कामसुखाची संकल्पना सांगण्यात आली, ती विषमलिंगी समागमाला धरून आहे, समलिंगीला धरून नाही. सुख..... मग ते विषमलिंगी संबंधातून मिळालेली असो किंवा समलिंगी संबंधातून मिळालेली असो, प्रयत्न आहेत ते सुखाकरिताच. मग विशमलिंगी संबंधातून मिळालेले सुख चांगले व समलिंगी प्रयत्नातून मिळालेले सुख वाईट किंवा त्याज्य, असा भेद करता येत नाही. खरे पाहता समलिंगी संबंध हे चांगले की वाईट हा प्रश्नच उपस्थित होत नाही. प्रश्न आहे तो इच्छेचा आणि वासनेचा. एखाद्या पुरूषाला किंवा स्त्रीला समलिंगी संबंध ठेवणे आवडत असेल आणि लैंगिक वासना तयार होत असेल तर त्यात वाईट असे काहीच नाही. जसे एखाद्या पुरूशाला स्त्री आवडते किंवा एखाद्या स्त्रीला पुरूश आवडतो. तसेच एखाद्या पुरूषाला वासनेने दुसरा एखादा पुरूष आवडेल व एखाद्या स्त्रीला वासनेने दुसरी एखादी स्त्री आवडेल, त्यात वाईट असे काहीच नाही. समलिंगी संबंध ठेवणे किंवा तसे अनुभवणे हे एक वाईट कृत्य आहे किंवा पाप आहे, हे जे विचार किंवा कल्पना आहेत ते सर्व समूह संस्काराचे प्रभाव आहेत. प्रत्यक्षात समलिंगीसंबंधाविषयी कुठल्याही शास्त्रात हीन किंवा त्याज्य म्हणून लेखण्यात आलेला नाही. बहुतांश समाजाचा या समलिंगी संबंधाला विरोध असला तरी व्यक्तिगत स्तरावर बहुतेक देशांतून या संबंधाला विरोध होताना दिसून येत नाही.

समलैंगिकता ही ऐतिहासिकदृष्ट्या जगातील बहुतांश देशांमध्ये व संस्कृतीमध्ये कायम अस्तित्वात होती व आहे. ह्याच्या अनेक खुणा अगदी पुराण कालापासूनच्या साहित्य, शिल्प, कला व इतर माध्यमांत आढळून येतात. मात्र 20 व्या शतकाच्या मध्यापर्यंत समलैंगिक वर्तणूक कधीही खुलेपणाने समाजात बोलली जात नसे. बदलत्या काळानुसार आपल्या आचरणाचे नियमही बदलत जातात. समलिंगी संबंधाविशयीच्या संकल्पनासुध्दा बदलत्या काळानुरूप बदलल्या. आज जसे समलैंगिक वर्तणुकीविषयी समाजात खुलेपणाने बोलले जाते. तसे भूतकाळात बोलले जात नसे. कारण ते एक हीन कृत्य समजले जायचे. मनूंच्या काळातील कामसुखाच्या आचरणाचे नियम आजच्या काळात लागू होतील असे नाही. त्या काळातील आर्थिक, राजकीय, सामाजिक व्यवस्थेला धरून कामसुखाच्या क्रिया सांगण्यात आल्या होत्या. जरी स्मृतींच्या माध्यमातून 'अमुक एखादी लैंगिक क्रिया केल्याने धर्म म्हणून स्वीकारार्ह असेल आणि अमुक एखादी क्रिया केल्याने अधर्म म्हणून निशिध्द असेल' असे सांगण्यात आलेले असले तरी ते सर्व विहित आणि निशिध्द क्रिया ह्या विशमलिंगी समागमाला धरूनच होत्या. समलिंगी समागमाविशयी कुठेही निशिध्द क्रिया म्हणून विवेचन करण्यात आलेली नाही, केवळ याच कारणाने म्हणून ती समलिंगी समागम क्रिया विहित आहे असे नसून त्या समलिंगी क्रिया एकमेकांच्या इच्छेने व वासनेने घडतात, त्याचा इतरांना अर्थात समाजाला उपद्रवही होत नसल्याने आणि त्या समागमातून दोघांनाही सुख मिळत असल्याने ती क्रिया निशिध्द नसून विहितच आहे असे म्हणावे लागेल.

यावर आक्षेपक कदाचित असे म्हणतील की, जरी ती क्रिया दोन व्यक्तींच्या एकमेकांच्या इच्छेने व वासनेने घडत असले तरी ती क्रिया नैसर्गिक नाही. समलैंगिकता ही अनैसर्गिक क्रिया असल्याने तो एक प्रकारचा मानसिक दोश असून समलैंगिक संबंध ही निशिध्द क्रिया आहे. या आक्षेपावर असे म्हणता येईल की, ती समलैंगिक समागमाची क्रिया अनैसर्गिक आहे असे कसे म्हणता येईलघ या क्रियाला अनैसर्गिक किंवा

.

नैसर्गिक क्रिया म्हणण्याची कसोटी काय? समूह ज्या क्रियेला स्वीकारेल त्याला नैसर्गिक म्हणावे की काय? आणि समूह ज्या क्रियेला निशिध्द म्हणून नाकारेल त्याला अनैसर्गिक म्हणावे की काय ? समूहातून आलेले विचार किंवा संस्कार हे सर्वतः सत्य असेलच असे नाही. म्हणून समलैंगिक समागमाच्या क्रियेला अनैसर्गिक क्रिया असे कसे म्हणता येईल बरे! असो. या क्रियेला तात्पुरते अनैसर्गिक क्रिया समजू. केवळ अनैसर्गिक क्रिया आहे म्हणून तो एक मानसिक दोश आहे, असेही म्हणता येत नाही. कारण 1970 च्या दशतकात अमेरिकेतील 'American Psychological Association' vkf.k 'American Psychiatric Association' ह्या महत्त्वाच्या वैद्यकीय संस्थांनी 'Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders' ह्या प्रमाण मानच्या गेलेल्या नियतकालिकांत 'समलैंगिकता हा मानसिक दोश नाही' हे स्पष्ट करण्यात आले. ह्या संस्थांनी वैज्ञानिक संशोधनाचा आधार आणि सांख्यिक पुरावा देउन हे दाखवून दिले की, समलैंगिक व्यक्तींची बौध्दिक, नैतिक क्षमता व जडणघडण इतर सर्वसामान्य व्यक्तींसारखीच असते आणि समलैंगिक व्यक्ती ह्या सर्वसामान्य निरोगी आयुश्य जगू शकतात व व्यवहारही करतात. वैद्यकीय पेश्याच्या ह्या दृष्टीकोनानंतर गेल्या दोन ते तीन दशकांत जगभरांत, विशेषतः कॅनडा, स्पेन, नॉर्वे, स्वीडन, बेल्जिअम, नेदरलॅंड व दक्षिण आफ्रिका ह्या पाश्चिमात्य देशांत समलैंगिकता मोठ्या प्रमाणावर स्वीकारली जाऊन समलैंगिक व्यक्ति खुल्यारितीने जगू लागल्या. बरे ही समागमाची क्रिया निशिध्द आहे, याचा आधार म्हणून धर्माकडे बोट दाखवाल तर धर्मामध्ये कुठेही त्या क्रियेला निशिध्द म्हणून सांगण्यात आलेली नाही.

लैंगिक सुख हे विषमलिंगी संबंधातून मिळालेली असो किंवा समलिंगी संबंधातून मिळालेली असो, सुख आहे ते स्पर्शामध्ये. लैंगिक सुख हे कुठल्या रूप–रंगामध्ये नसून तो स्पर्शामध्ये आहे. रूप–रंग पाहणे किंवा निवडणे ही एक स्पर्शापूर्वी होणारी एक क्रिया किंवा माध्यम आहे. वस्तुतः स्पर्शसुखाकरिता कुठल्याही विशिष्ट अशा रूप–रंगाची आवश्यकता नाही. प्रत्यक्षात जेंव्हा समागमाचा आनंद मिळतो त्यावेळी तिथे रूप–रंग उपस्थित नसतात. म्हणजे याचाच अर्थ असा की, स्पर्शसुखाचा आणि विशिश्ट अशा रूप–रंगाचा काहीही संबंध नाही. लैंगिक ;स्पर्शसुखद्ध सुखाकरिता वायूला केवळ आकाश अर्थात केवळ पोकळी लागते. आकाश अर्थात लिंग आणि वायू अर्थात रूप. वायूचा आकाशात प्रवेश झाला म्हणजेच अंतःकरणवृत्ती स्थिर होतात. तिथे दुसरा कुठलाही विशय उपस्थित नसतो. त्यामध्ये आनंद किंवा सुख आहे. तोच खरा आत्मानंदाचा बिंब आहे. लिंगाचा योनीमध्ये प्रवेश होताना म्हणजेच समागम क्रियेच्यावेळी त्या योनीचा रूप कोणता, रंग कोणता याचा काहीही संबंध नाही. रूप–रंग हे विषय असून केवळ वायू–आकाश संबंधातून आनंद प्राप्त होते. मग ते विषमलिंगी असो किंवा समलिंगी असो. विषमलिंगी समागमाच्या वेळी आनंदाचा रंग–रूपाशी संबंध येत नाही. सुंदर पुरूष असणे आणि सुंदर स्त्री असणे हे रंग–रूपात्मक विषयच होत. रंग रूपात्मक विषयाचा लैंगिक सुखाशी जर संबंध नसेलच तर समलिंगी समागम क्रियेमध्ये सुखानुभूतीकरिता दोन पुरूष विषय म्हणून एकत्र येणे किंवा दोन स्त्रिया विषय म्हणून एकत्र येणे आणि त्या संभोगातून जर लैंगिक सुख मिळत असेल तर समलिंगी समागमाची क्रिया ही वाईट ठरू शकत नाही. म्हणून समलिंगी क्रिया ही एक हीन, त्याज्य अशी समागमाची क्रिया नसून त्यामध्ये सुध्दा केवळ वायू–आकाश संबंध आहे आणि त्यातून लैंगिक सुख प्राप्त होते.

यावरून हे सिध्द होते की, समलिंगी समागमातूनसुध्दा सुख प्राप्त होऊ शकते आणि ती वाईट कृत्य किंवा मानसिक दोष नाही. जरी हे विचार भूतकाळातील रचण्यात आलेल्या स्मृतींमध्ये दिसून येत नसले तरी आता या वर्तमानात जर मनूंसारखा एखादा ऋशी जन्मला आणि या देश कालानुरूप स्मृती लिहू लागला तर कदाचित तो या समलिंगी संबंधालासुध्दा मान्यता देईल. पूर्वी भूतकाळात या प्रकारचे वर्तन किंवा कर्मे उघड–उघड घडत नव्हती. मात्र आता या वर्तमानात या क्रिया स्वेच्छेने व वासनेने घडतात. म्हणून समलिंगी समागम वर्तणुकीतूनसुध्दा यथेच्छ सुखोपभोग घेऊ शकतो. त्यामुळे समलिंगी समागमाची क्रिया वाईट नसून योग्य आहे. आपला वंश वाढवावा, संतती व्हावी हा उद्देश समोर ठेवून विषमलिंगी समागम क्रिया घडते किंवा होते. जर संतती करिता विषमलिंगी क्रिया उपयोगी पडते आणि संतती करिता समलिंगी क्रिया उपयोगी पडत नाही. म्हणून ती समलिंगी क्रिया वाईट आहे. असे जर म्हणत असाल तर तसे म्हणने चुकीचे ठरेल. कारण संभोगाची क्रिया ही केवळ संतती करिताच असते असे नसून आनंदाकरिताही असते. असे अनेक व्यक्ती आहेत की जे आपल्या केवळ लैंगिक सुखाकरिता संततीची अपेक्षा करित नाहीत. केवळ आपल्या सुखाकरिताच ती संभोगाची क्रिया ते करतात. केवळ संततीकरीता संभोगाची क्रिया नाही. सर्वच जण आपल्याला संतती व्हावी अशी अपेक्षा करीत नाहीत. असे कितीतरी विषमलिंगी विवाहीत आहेत जे संततीची अपेक्षा करीत नाहीत. केवळ लैंगिक सुखाकरिता ते दोघे एकत्र येतात. मग समलिंगी विषयी असे का समजण्यात येऊ नये आणि वस्तुस्थिती अशी आहे की, काही देशांमध्ये समलिंगी विवाहाला मान्यताही देण्यात आली आहे. समलिंगी संबंधातून तर संतती होणे शक्यच नाही. याचाच अर्थ असा, कि केवळ सुखाकरिता संभोग करणे आणि संतती करीता संभोग करणे यात फरक आहे, अर्थातच दोन्हीमध्ये संभोग ही क्रिया आहेच. म्हणून लै. सुखाकरिता एखादा पुरूष दुसऱ्या एखाद्या पुरूषाची निवड केली किंवा एखादी स्त्री दुसऱ्या एखाद्या स्त्रीची निवड केली, तर त्यात वाईट असे काहीच नाही. दोन पुरूषांमधील संबंध किंवा दोन स्त्रीयांमधील संबंधामध्ये जर संतती होणे उद्दिष्टच जर नसेल तर तो संबंध (समलिंगी) वाईट करणारच नाही.

(एका टप्यावर वायू– आकाश संबंधसुध्दा विषयच होतात, त्याच्याही पलीकडे आहे तो केवळ आनंद जिथे कुठलाही विषयच नाही, विशयरहित आनंद तोच ब्रह्मानंद)